पाक्षिक | **शेतकरी संघटक** | वर्ष १० वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | अंक २२ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | ६ मार्च १९९४

# तीन तोंडाचे अंदाजपत्रक

— शरद जोशी

**चित्रपटाचा नवा हीरो मनमोहन**

डॉ. मनमोहन सिंग यांनी आपले चौथे लागोपाठचे अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले. १२९ क्रिकेटसामन्यांपैकी १२८ सामन्यांत खेळणाऱ्या कपिल देवच्या बरोबरीचा हा उच्चांकच झाला. सिंग साहेबांचे अंदाजपत्रकी भाषण कपिल देवच्या खेळाप्रमाणेच चित्तवेधक फटकेबाजीचे होते. चिंतामणि द्वारकानाथ देशमुखांनंतर अंदाजपत्रकी भाषण करतांना दीड-दोन तास श्रोत्यांना खिळवून ठेवण्याचा चमत्कार मनमोहन सिंग करून दाखवत आहेत. दूरदर्शनवर अंदाजपत्रकी भाषण, दाखवले जाते म्हणून लोक ऐकतात असे नाही; झी चॅनेलवर चित्रपट दाखवला जात होता तरी लोक मनमोहन सिंगांचे भाषण ऐकत होते. नाट्य, शेरोशायरी, सस्पेन्स, हलके फुलके विनोद, काय पाहिजे ते त्यांत होते.

सी. डी. देशमुख भाषणात अभिजात संस्कृत साहित्यातील अवतरणे देत आणि अनेकवेळा उस्फूर्त काव्यरचनाही करीत. मनमोहन सिंगांचा भर शेरोशायरीवर. पण त्यांची निवड शायरीचा सखोल अभ्यास असणाऱ्या सच्च्या जाणकाराची नाही; पाच पन्नास मशहूर शेर कानांवरून गेलेल्या किरकोळ दर्दीची आहे. त्यांच्या शायरी अवतरणांनी लोकसभेतील काँग्रेस सदस्यांना बाके बडवण्याची संधी मिळाली, पण अर्थमंत्र्यांच्या भाषणाची शान कमी झाली, वाढली नाही. पंतप्रधानांच्या थोर नेतृत्वाचा त्यांनी वारंवार आग्रहाने उल्लेख केला. सारी हयात लांगूलचालन करणाऱ्या एखाद्या काँग्रेसी पुढाऱ्याच्या तोंडीदेखील असली बाष्फळ स्तुती आता ऐकवत नाही. डॉ. मनमोहन सिंगांच्या तोंडी पंतप्रधानांची वारेमाप स्तुती बीभत्स वाटत होती.

**मनमोहनांची संमोहन विद्या**

आर्थिक सुधार, खुली व्यवस्था यासंबंधीची धोरणे मांडतांना अर्थमंत्री हयात काँग्रेसमध्ये काढलेल्या पुढाऱ्यांपेक्षादेखील पक्षाभिमानाचा आक्रमक पवित्रा घेतात. आर्थिक सुधार आणि काँग्रेसपक्ष तथा पक्षाचे नेते नरसिंह राव यांचा त्यांनी असा काही संबंध जोडून दिला आहे की काँग्रेस म्हणजेच खुली व्यवस्था असा भास निर्माण व्हावा. मनमोहन सिंग ज्या आर्थिक धोरणांविरुद्ध आज तिरीमिरीने बोलत आहे ती धोरणे राबवण्यात, सेवेतून निवृत्त होईपर्यंत, त्यांचा स्वतःचाच मोठा हातभार लागलेला आहे. जी पातके धुण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे ती पातके काँग्रेसच्या चार दशकांच्या शासनाची आहेत याचा त्यांनी संमोहन विद्येने भारले गेल्यासारखा लोकांना विसर पाडला आहे. नेहरू-व्यवस्थेची पापे धुवून टाकतांना नेहरूंचाच जयजयकार करण्याचे त्यांचे कसब मोठे वाखणण्यासारखे आहे.

खुल्या व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल सुरू करणे, काँग्रेस शासनाची ४० वर्षांची धोरणे उलटी फिरवणे, त्याबरोबरच मागील चुकांची किंमत पक्षाला द्यावी लागणार नाही याची काळजी घेणे अशी तारेवरची मोठी अवघड कसरत हे करीत आहेत. त्याचबरोबर नोकरदारांच्या मिराशींना धक्का लागणार नाही, संघटित कामगार नाखूष होणार नाहीत याचीही त्यांना चिंता आहे. खुली व्यवस्था असली म्हणून काय झाले? ''गरीबी हटाओ''ची भाषा खालू राहिलीच पाहिजे. गरीबी हटवण्याच्या घोषणेने इंदिरा गांधीदेखील देवतासमान बनल्या. गरीबी काही कोठे कमी झाली नाही. 'गरीबी हटाओ' कार्यक्रमाचा पक्षाच्या प्रचारकामात मोठा उपयोग होतो. तेव्हा तो कार्यक्रम चालू राहिलाच पाहिजे. कल्याणकारी कार्यक्रम निरुपयोगी असतात हे सर्वसिद्ध, सर्वमान्य झाले तरी कल्याणकारी कार्यक्रम मते मिळवण्यासाठी मोठे उपयोगी असतात; ते चालू राहिलेच पाहिजेत. असे परस्पर विरुद्ध कार्यक्रमांचे गाठोडे वित्तमंत्र्यांनी अंदाजपत्रकाच्या नावाने लोकसभेसमोर ठेवले. दावोस येथे पंतप्रधानांनी 'मध्यममार्गी' आर्थिक धोरणाचे तत्त्वज्ञान मांडले ते अशा गाठोड्याचेच. समाजवादाची स्पप्ने पाहणाऱ्या नेहरूंनी 'समाजवादी धर्तीची समाजरचना' असा मध्यममार्ग काढला आणि सारा देश नोकरदारांच्या हाती सोपवला. खुल्या व्यवस्थेचे स्वप्न पाहणारे नरसिंहराव 'खुल्या पद्धतीच्या समाजरचने' चा व्यवहारी मध्यममार्ग धरत आहेत. नवी व्यवस्था म्हटले तर खुली, पण सारी महत्त्वाची नियंत्रणे सरकारच्या हातीच. 'समाजवादी धर्तीच्या समाजरचने'चा पुरस्कार करून सत्ता हाती ठेवणाऱ्या काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा अबाधित.

**केंद्रीय अंदाजपत्रक १९९४-९५**

**पूर्णता म्हणजे विनाश?**

अंदाजपत्रक सादर केल्यानंतर दिलेल्या मुलाखतीत वित्तमंत्र्यांनी एक महत्त्वाचे वाक्य

वापरले. आर्थिक सुधारांकडे अधिक वेगाने आपण का जात नाही? आणि चलनवृद्धीचा धोका घेऊनही वित्तीय तूट आटोक्यात का ठेवली नाही याचे स्पष्टीकरण देतांना वित्तमंत्री म्हणाले, 'Best can be enemy of good' म्हणजे पूर्णतेच्या शोधांत कार्यनाय दडलेला असतो. पंडित नेहरूंच्या काळापासून व्यवहारवादाचे कित्ते गिरवलेला, समाजवादी शैलीच्या समाजरचनेसाठी सेवा रुजू केलेला हा नोकरदार आता खुल्या पद्धतीची समाजरचना उभारण्यासाठी हजर झाला आहे.

दुर्दैवाची गोष्ट ही की नेहरूपद्धतीला जन्मभर कसोशीने विरोध केलेले भले भले लोक राव-सिंग जोडीच्या हातचलाखीला आणि संमोहन विद्येला भुलले आहेत आणि काँग्रेसने टाकून दिलेल्या सरकारशाही धोरणांशी घरोबा करू पहात आहेत. सार्वजनिक क्षेत्राचे आधिपत्य, स्वावलंबनाच्या नावाखाली देशी अकार्यक्षम कारखानदारीला संरक्षण इत्यादी टाकाऊ ठरलेल्या संकल्पनांचा पुरस्कार डावे पक्ष करतात यांत काही आश्चर्य नाही. त्यांचा पिंडच मुळी 'नवीन काही शिकायचे नाही आणि जुने काही विसरायचे नाही' असा.

पण 'असरकारी' कार्यक्रमांचा आग्रह धरणारे गांधीवादीदेखील नेहरूछापाची धोरणे चालू राहावीत असा आग्रह धरू लागले आहेत हे मोठे विनोदी दृश्य आहे.

### तारेवरच्या कसरती

खुली व्यवस्था, परिवर्तनीय रुपया, कार्यक्षम करव्यवस्था यांच्याबरोबरच नोकरशहांना संरक्षण आणि पक्षाची प्रतिमा जपणे अशा चित्रविचित्र वस्तूंचे गाठोडे घेऊन मनमोहन सिंगांचा फेरीवाला देशापुढे उभा आहे. वेगवेगळ्या चिजा ग्राहकापुढे ठेवताना फेरीवाल्याप्रमाणे ते वेगवेगळ्या युक्त्या वापरतात. मनमोहन सिंगांच्या यंदाच्या अंदाजपत्रकाची निदान तीनचार तोंडे आहेत.

### फेब्रुवारी : अंतिम दिवसे

दूरदर्शनच्या प्रसारामुळे अंदाजपत्रक सादर करण्याचा दिवस म्हणजे राजकर्त्या पक्षाला शंभरेक कोटी रुपयांची फुकट प्रसिद्धी. अशी सुवर्णसंधी कोणताही मुत्सद्दी सत्ताधारी का म्हणून गमावेल? २८ फेब्रुवारीला सादर करायच्या अंदाजपत्रकांत कठोर असा कोणताही निर्णय जाहीर करणे म्हणजे आपल्याच हाताने आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणे. दूरदर्शवर साबण, सुगंधी तेले, सोंदर्य प्रसाधने यांचे जाहिरातदार वापरतात ती सर्व कुशलता वापरून अर्थमंत्री आपला माल विकायला उभे राहतात. विक्रीचा माल अंदाजपत्रक नाही, आर्थिक धोरणही नाही, त्यांना विकायचा आहे पक्ष आणि पक्षाचा 'थोर' नेता.

अंदाजपत्रकाच्या शुभादिनाच्या आधी सगळी दुष्ट, कठोर आणि नीच कर्मे उरकून गॅस, पेट्रोल, कोळसा, अन्नधान्य अशा वस्तूंच्या प्रशासित किंमती वाढवून टाकायच्या; रेल्वे, टपाल इत्यादींचे दर चढवून द्यायचे आणि फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी सुहास्य मुद्रेने गोडगोड अंदाजपत्रक सादर करायचे ही पद्धत दिवसेंदिवस अधिकाधिक रूढ होत जाणार आहे.

### तुटीचा भस्मासुर

यंदाचे अंदाजपत्रक तयार करतांना अर्थमंत्र्यांसमोर सर्वांत गंभीर प्रश्न होता तो अंदाजपत्रकी आणि वित्तीय तुटीचा. अंदाजपत्रकाआधी प्रशासित किंमती वाढवून वित्तीय वर्षाच्या शेवटच्या दोन महिन्यात चारपाच हजार कोटी रुपयांची कमाई केली तरी तुटीचा आकडा आटोक्यात आला नाही. ३६ हजार कोटी रुपयांची वित्तीय तूट येईल असा गेल्या वर्षीचा अंदाज होता. प्रत्यक्षात ही तूट ५६ हजार कोटींची निघाली. शासनाचे अंदाजपत्रकी नियोजन इतके गळबट असेल याची शासनाच्या सर्वाधिक कठोर टीकाकारांनादेखील कल्पना करता आली नाही. तूट भरून काढण्यासाठी उत्पन्न वाढवणे आणि/किंवा खर्च कमी करणे यापलिकडे तिसरा पर्याय असूच शकत नाही.

### मनमोहनांचे मोहक रूप

२८ फेब्रुवारीच्या शुभदिनी अमंगल असे काही बोलायचे नाही हे पक्के ठरले असल्यामुळे करात वाढ करणे संभवच नव्हते. करव्यवस्थेत वित्तमंत्र्यांनी कपात केली, एवढेच नव्हे तर करव्यवस्था सोपी आणि सुटसुटीत असावी, भ्रष्टाचाराला फारसा वाव देणारी नसावी अशा दृष्टीने काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या आहेत. डॉ. मनमोहन सिंगांचे अर्थशास्त्राचे व्यक्तिमत्व अंदाजपत्रकातील ह्या अध्यायातच काय ते दिसते. परिपूर्णतेला सैद्धांतिक विरोध करणाऱ्या अर्थमंत्र्यांनी साहजिकच या सुधारांची गती मोठी मंद ठेवली. ट्रक चालकांकरिता एक वैकल्पिक करपद्धती सुचवण्यात आली आहे. मालकीच्या प्रत्येक ट्रकमागे कराची रक्कम ठरलेली. ती ठरवण्यासाठी काही हिशेब देण्याची गरज नाही. अशी पद्धत बहुतेक क्षेत्रांत सहज लागू करता आली असती. करवसुलीचा खर्च कमी झाला असता, उत्पन्न वाढले असते. असली परिपूर्णता अर्थशास्त्री मनमोहनसिंगांना रुचेल, पण पुढारी मनमोहन सिंगांना पचणारी नाही.

### पुढाऱ्यांना हवी उधळपट्टी

कराचे दर वाढवता येत नाहीत आणि त्याबरोबर सरकारी खर्च आणि उधळमाधळी थांबवता येत नाही. नोकरदारांवर दोनतृतीयांश अंदाजपत्रक खर्चले जाते. यातील प्रत्येक नोकरदार उद्योजकांच्या मार्गातील अडसर असतो. खुल्या व्यवस्थेचे डिमडीम वाजले तरी गेल्या वर्षी केंद्रशासनात ४० हजार नवीन नोकऱ्या तयार करण्यात आल्या आणि मंत्र्यांच्या पगारभत्त्यावरील खर्च चौपटीने वाढला. तरीही या सगळ्या नोकरशहांचा महागाईभत्त्याचा एक हप्ता रोकण्याची सरकारची ताकद नाही.

कल्याणकारी कार्यक्रम राबवण्याचे खूळही थांबवता येत नाही. गेल्या १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांनी लाल किल्ल्याच्या तटावरून जाहीर केलेल्या कल्याणकारी कार्यक्रमांबाबत त्यांनी वित्तमंत्र्यांशी सल्लामसलतदेखील केली नव्हती.

मग तूट घटवायची कशी? साधे सोपे उत्तर. सरकारी खर्चाला कात्री लावायची नाही असे ठरले की तूट घटवण्याचा कोणताही प्रामाणिक मार्ग राहात नाही. या विषयावर बोलतांना अर्थमंत्री पक्के राजकारणी बनले. अर्थशास्त्राचे सारे सिद्धांत, ज्ञान आणि अनुभव त्यांनी बाजूला ठेवले. कराचे दर कमी केले तरी करांचे उत्पन्न वाढणार आहे, कारण करव्यवस्था कार्यक्षम होणार आहे आणि करातील सुटींमुळे उत्पादनात अशी काही भरपेट वाढ होणार आहे की सरकारी तिजोरीत उत्पन्नाचा महापूर येणार आहे आणि पुढील वर्षी अंदाजपत्रकी आणि वित्तीय तूट खूपच कमी होईल अशी चलाखीची भाषा वापरून वित्तमंत्र्यांनी आपली सुटका करून घेतली आहे.

## उत्पादन का वाढावे?

गेल्या वर्षीचा अनुभव सांगतो की कराचा भार कमी केल्याने उत्पन्न वाढते या कल्पनेत काही तथ्य नाही. सीमाशुल्क आणि इतर करांचा भार कमी केल्यामुळे देशातील उत्पादन वाढेल या आशावादालाही काही आधार नाही. सरकारी नोकरशाही चालू आहे, लायसेंस परमिट राज्य चालू आहे. तोपर्यंत देशात आर्थिक चैतन्य निर्माण होईल अशी आशा करायला नको. बँका, विमा, वहातूक या सगळ्या व्यवस्था सरकारच्या हाती आहेत तोपर्यंत कार्यक्षम उद्योजकदेखील एक रतिमात्र पुढे हालू शकत नाहीत. केवळ करामध्ये सूट मिळाली म्हणजे भारतीय कारखानदार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करून उभे राहू शकतील ही कल्पनाही चुकीची आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या प्रेरणांना प्रतिसाद देण्याची ताकद प्रामुख्याने शेतीक्षेत्रात आहे पण त्या क्षेत्रात तर खुलेपणाचे वारे फिरकू म्हणून द्यायचे नाही असा सरकारी निश्चय आहे.

पुढल्यावर्षीची तूट यंदापेक्षा कमी असण्याची शक्यता आज तरी काही दिसत नाही.

## शेतीला खुले वारे नको?

यंदाच्या अंदाजपत्रकाचे सर्व सव्यापसव्य अशा तऱ्हेने पार पडले की देशात जणू शेती नावाची गोष्टच नाही, असली तरी तिला खुलेपणाची गरज नाही. खतावरील सबसिडी गेल्यावर्षी ४००० कोटी रुपयापर्यंत कमी करण्यात आली होती. त्याच पातळीवर ती राहील. शेतकऱ्यांना देशांतर्गत वाहतुकीचे स्वातंत्र्य आणि निर्यातीची मोकळीक देण्याची भाषा वित्तमंत्र्यांनी वापरली पण काही ठोस कार्यक्रम सुचवला नाही. शेतीक्षेत्राला कर्ज पुरवठा व्हावा याकरिता नाबार्ड, ग्रामीण क्षेत्रीय बँका आणि सहकारी संस्था यांना भांडवल पुरवठा करण्याकरिता ३०० कोटीच्या आसपास तरतूद करण्यात आली आहे ती खास नेहरू जमान्याशी जुळणारी आहे. शेती परवडणारी नसेल तर त्यासाठी कर्जपुरवठा करण्याचा आग्रह वित्तीय संस्थाना करणे हे मुळातच खुल्या व्यवस्थेशी सुसंगत नाही. ग्रामीण बँकांना भांडवल पुरवण्याऐवजी शेतीमध्ये खुलेपणा आणण्यासाठी वित्तमंत्र्यांनी पावले उचलली असती तर ग्रामीण क्षेत्रांत कर्जपुरवठा व्हावा यासाठी कृत्रिम आटापिटा करण्याची गरजच पडली नसती.

वित्तमंत्र्यांनी "उद्याचे उद्या पाहता येईल, आज तर अडचणीतून सुटलो." अशा हिशेबाने वित्तीय तुटीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे पुढे ढकलले आहे, पण तुटीचे हे भूत असे संपणारे नाही. मनमोहन सिंगांना किंवा त्यांच्या नंतर येणाऱ्या अर्थमंत्र्यांना आणि काँग्रेसखेरीज इतर पक्ष सत्तेवर आला तर त्यांच्या वित्तमंत्र्यांनाही या भूतावरचा मंत्र शोधून काढावाच लागेल. हातचलाखीने हा प्रश्न सुटणारा नाही.

## अनेक चेहरे अनेक सोंगे

अंदाजपत्रकाचे एक विक्राळ तोंड प्रशासकीय किंमतीच्या वाढीच्या रूपाने अंदाजपत्रकाआधीच दिसले होते. अंदाजपत्रकाच्या दिवशी त्याची आणखी दोन तोंडे दिसली. एक अर्थशास्त्रज्ञ डॉ. मनमोहन सिंगांचे आणि दुसरे नव्याने पुढारी बनलेल्या, नव्या मुल्लाच्या उत्साहाने बांग देणाऱ्या, काँग्रेसचे वित्तमंत्री मनमोहन सिंग यांचे. किंवा एक तोंड आजच्या मनमोहन सिंगांचे आहे. दुसरे तोंड कालच्या. आणखी एक शक्यता अशी – एक तोंड आजच्या मनमोहन सिंगांचे तर दुसरे तोंड काँग्रेस पक्ष नेते पी. व्ही. नरसिंहराव यांचे.

*(ग्यानबा न्यूज सर्व्हिस)*

●●●

# बिगर सभासदांना उसासाठी ७४० रुपये भाव देणे सक्तीचे

## औरंगाबाद खंडपीठाचा आदेश – ३ मार्च १९९४

**बिगर सभासदांना प्रतिटन ऊसासाठी सातशे चाळीस रुपये भाव देण्यासंबधीचा औरंगाबाद खंडापीठाचा आदेश राज्यातील सर्व साखर कारखान्यांना लागू राहाणार आहे.**

बिगर सभासद ऊसउत्पादकांनी सादर केलेल्या याचिकांच्या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने २१ जानेवारी १९९४ रोजी उसाला प्रतिटन सातशे चाळीस रुपये भाव देण्याचा निर्णय दिला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकार, बेलगंगा सहकारी साखर कारखाना, कन्नड सहकारी साखर कारखाना यांनी सर्वोच्च न्यायालयात अपिल केले होते. त्या अपिलांना समोर ठेवून सर्वोच्च न्यायालयाने औरंगाबाद खंडपीठाकडून पुढील मुदयांबाबत स्पष्टीकरण मागितले होते.

१) २१ जानेवारी १९९४ रोजी याचिका क्रमांक ४११८/९४ मध्ये प्रतिटन उसाला सातशे चाळीस रुपये भाव देण्याचा निर्णय राज्यातील सर्व साखर कारखान्यांना लागू आहे काय? २) सातशे चाळीसपैकी एकशे चाळीस रुपये बँक गॅरेंटीच्या स्वरूपात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टीकरण मागितल्यानंतर साखर महासंघ, कन्नड सहकारी साखर कारखाना, गंगापूर सहकारी साखर कारखाना यांच्यातर्फे औरंगाबाद खंडपीठापुढे अर्ज सादर करण्यांत आले. न्या. बी. एन्. देशमुख आणि न्या. व्ही. व्ही. कामत यांच्या खंडपीठापुढे ह्या अर्जाचा विचार झाला. खंडपीठापुढे साखर महासंघातर्फे बॅ. ए. के. पाटील व ॲड. ललित, कन्नड कारखान्यातर्फे ॲड. अनिल नाईक व ॲड. दिघे, बेलगंगा कारखान्यातर्फे ॲड. पी. आर. पाटील, गंगापूर कारखान्यातर्फे ॲड. पारुंडेकर तसेच ऊस-उत्पादकांतर्फे दिलीप पाटील बनकर आणि ॲड. कास्लीवाल यांनी बाजू मांडली.

उसाला प्रतिटन सातशे चाळीस रुपये भाव दिल्यास साखर कशी महागेल, काही कारखान्यांना हा भाव देणे कसे परवडणार नाही, उसाचा भाव देण्याची प्रचलित पद्धत काय या अनुषंगानी साखर महासंघातर्फे युक्तिवाद करण्यात आला. साखर कारखान्यातर्फेही आपली बाजू मांडण्यात आली. बँक गॅरेंटीची रक्कम उसाचा भाव होऊ शकतो काय, हा मुद्दा ही निघाला. राज्यसरकारतर्फे, दोन खंडपीठांच्या आदेशात तफावत असल्यामुळे हे प्रकरण तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे चालवावे, अशी विनंती करण्यात आली.

बाजार पेठेतील किंमती (मार्केट प्राईस) असलेल्या सातशे चाळीस रुपयांतील सहाशे रुपये पंधरा दिवसांत द्यायचे आहेत आणि एकशे चाळीस रुपयांची बँक गॅरेंटी आहे. बँक गॅरेंटी असली तरीही ती रक्कम नंतर द्यायची असल्याने बँक गॅरेंटीची रक्कम ऊसभावात अंतर्भूत होते, अशा आशयाचा युक्तिवाद ऊसउत्पादकांकडून करण्यात आला. आदेशाची अंमलबजावणी जितकी पुढे ढकलता येईल तितकी ढकलावी असा यामागील उद्देश दिसतो, अशी शंकाही ॲड. बनकर यांनी बोलून दाखविली.

***(बिगर सभासदांनी वाघपणा सिद्ध केला, आता पहायचे सभासद शेतकरी काय करतात ते.)***

# गॅट, शरद जोशी व साधना

## – अशोक कोतवाल (कॅनडा)

साधनेच्या २५ डिसेंबरच्या अंकात 'गॅट वर सही हा देशाचा विश्वासघात' ह्या शीर्षकाचा अग्रलेख वाचला. डंकेल प्रस्तावातील तरतुदी मान्य केल्यामुळे भारतीय शेतकऱ्याचे नुकसान होईल, इतकेच नव्हे तर ह्याचा परिणाम भारतीय शेतकरी गुलाम होण्यात येईल असा मुद्दा ह्या अग्रलेखात ठासून मांडण्यात आला आहे. महाराष्ट्रातील हजारो शेतकरी ज्यांच्या पावलामागे पावले टाकत चालतात त्या शरद जोशींनी डंकेल प्रस्तावामुळे भारतीय शेतकऱ्यांचे भले होईल असा निर्वाळा दिला आहे. भारतीय शेतकऱ्यांचे हित शरद जोशींपेक्षा साधनेच्या संपादकाला जास्त चांगले समजते हे मला पटत नाही. केवळ शेतकऱ्याचे हित शेतकऱ्याला जास्त चांगले कळत असणार असा मुद्दा मला मांडायचा नाही. शरद जोशींचा युक्तिवाद जास्त तर्कशुद्ध, अर्थशास्त्रातील सिद्धांतांशी सुसंगत व वस्तुस्थितीबाबत बिनचूक आहे असे मला वाटते. 'शेतकरी संघटका'त शरद जोशी आपले विचार अतिशय सोप्या भाषेत मांडत असतात. साधनेच्या अग्रलेखात मांडलेले सर्वच्या सर्व मुद्दे त्यांनी कधीच खोडून काढलेले आहेत. त्यांच्या युक्तिवादाचा काहीही परामर्श न घेता डंकेल प्रस्तावामुळे भारतीय शेतकऱ्याचे नुकसान होईल हे इतके ठामपणे तुम्ही कसे म्हणू शकता, असे मला विचारायचे आहे.

गॅटचे सभासद होणे हा प्रत्येक राष्ट्राचा स्वतंत्र निर्णय असतो. अमेरिकेने किंवा आणि कुठल्या बलाढ्य राष्ट्राने सक्ती केली म्हणून भारत गॅटचा सभासद झाला नाही. गॅटचे सभासद होण्यात राष्ट्राचे हित असते, कारण आंतरराष्ट्रीय व्यापार प्रत्येक राष्ट्राच्या हिताचा असतो. खुल्या व्यापारातील अडथळे कमी करणे हे गॅटचे मुख्य काम आहे. अर्थात प्रत्येक राष्ट्राला वाटत असते की आपल्या निर्यातीवर दुसऱ्या राष्ट्रांनी निर्बंध घालू नयेत, पण आपल्याला मात्र निर्बंध घालायला परवानगी असावी. उदाहरणार्थ, अमेरिकेला युरोपमध्ये सोयाबीन व रेपसीड निर्यात करायची घाई झाली आहे, पण जपानी मोटारगाड्या किंवा इलेक्ट्रॉनिक्स प्रॉडक्ट्स् अमेरिकन बाजारपेठेत स्पर्धेसाठी उतरतात तेव्हा अमेरिकन कंपन्यांकडून भरपूर आरडाओरडा ऐकू येतो. तसेच अमेरिकन शेतमालाची आयात करताना फ्रेंच सरकारला फ्रेंच शेतकऱ्यांच्या राजकीय विरोधाला तोंड द्यावे लागते, पण जेव्हा अमेरिकन सरकार फ्रेंच वाईनवर निर्बंध घालायची धमकी देते तेव्हा फ्रेंच सरकार फ्रान्सची बाजारपेठ शेतमालाच्या आयातीला उघडण्यासाठी बळजबरीने तयार होते. काही झाले तरी दोन्ही राष्ट्रांना व्यापार हवा असतो व म्हणूनच ती तडजोड करायला राजी असतात. एकमेकांशी व्यापार करू इच्छिणाऱ्या प्रत्येक दोन राष्ट्रांनी आपापसात विचारविनिमय करून व्यापाराची एक संहिता निर्माण करायची, त्यापेक्षा सर्व राष्ट्रसमूहाने मिळून एक संहिता तयार करणे अर्थातच जास्त सोयीचे पडते. ह्यातून गॅटचा जन्म झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक व्यापार वेगाने वाढला. तांत्रिक ज्ञानात प्रचंड वाढ झाली. जपानसारख्या सर्वनाश झालेल्या आशियाई देशाने पाश्चात्य देशांत झालेल्या संशोधनाचा वापर करून कारखाना क्षेत्रात नेत्रदीपक मजल गाठली. स्वतःच्या कमी वेतनांच्या श्रमशक्तीची पाश्चात्य संशोधनाशी सांगड घालून पाश्चात्य देशांतील उद्योगांना स्पर्धेचे आव्हान दिले. जहाजनिर्मिती, मोटारगाड्या, पोलाद, मशिनरी, इलेक्ट्रॉनिक्स असे एका मागोमाग एक अमेरिकेचे बालेकिल्ले कोसळले. अमेरिकन रस्त्यांवर जनरल मोटर्स किंवा फोर्ड ऐवजी टोयोटा किंवा निसानच्या गाड्या जास्त दिसू लागल्या. अमेरिकन घरांमधून जपानी टी. व्ही., जपानी व्हिडीओ प्लेअर्स जास्त दिसू लागले. मायक्रो सर्किट्री व कंप्यूटर्स हे तर संपूर्ण अमेरिकनांनी उभे केलेले उद्योग. अथपासून इतिपर्यंत सर्व संशोधन अमेरिकेतच झालेले. काही वर्षांत हे सर्व नवीन निर्माण केलेले ज्ञान आत्मसात करून जपानी कंपन्यांनी अमेरिकन कंपन्यांना शह दिला. आपण निर्माण केलेले ज्ञान बाकीचे जग इतक्या पटकन आत्मसात करते व स्वतःच्या स्वस्त श्रमशक्तीचा वापर करून आपल्यालाच हरवते ह्याबाबत अमेरिकेत एक भीतीची भावना निर्माण झाली आहे.

**नेहरूव्यवस्थेतील सुरक्षित लाभांना चटावलेले सर्वच घटक गॅट कराराला विरोध करीत आहेत. पण या घटकांतीलही काही अभ्यासू मंडळी गॅट कराराचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करतात. 'साधना'परिवारातील एक अभ्यासक डॉ. अशोक कोतवाल यांनी साधनेने घेतलेल्या गॅटविरोधी भूमिकेवर केलेली परखड टीका 'साधने'च्या १२ फेब्रुवारी ९४ च्या अंकामध्ये प्रकाशित झाली आहे.**

*साभार पुनर्मुद्रण*

ज्या विकासाच्या प्रक्रियेमुळे जपानमध्ये जीवनमान सुधारले त्याच विकासाच्या प्रक्रियेमुळे अनेक आशियाई राष्ट्रे भरभर पुढे येत आहेत. आपल्यापेक्षा समृद्ध देशांतील तंत्रज्ञान आत्मसात करायचे व आपल्या स्वस्त श्रमशक्तीच्या साहाय्याने समृद्ध देशांतील बाजारपेठा काबीज करायच्या. आपल्या देशात रोजगार निर्माण करायचे. खुल्या व्यापाराने अमेरिकन कारखानी क्षेत्रात गहजब माजला आहे. अमेरिकन घरात रेडिओ, टी. व्ही., व्हीडीओ प्लेअर, स्वयंपाकघरातील उपकरणे ह्या गोष्टी बहुतेक तैवान, सिंगापूर, मलेशिया, कोरिया, थायलंड अशा कुठल्या तरी आशियाई देशांत बनवलेल्या आहेत हे लक्षात येते. दुकानात कपडे, खेळणी, पादत्राणेसुद्धा इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, चीन अशा राष्ट्रांत उत्पादिलेली आहेत हेही नजरेत भरते. गेल्या वीस वर्षांत असे अनेक आशियाई देश समृद्ध देशांशी व्यापार करून पुढे आले. तिथली गरिबी हटण्यात आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्थान फार मोठे आहे. चीनची आयात व निर्यात सध्या २०० अब्ज डॉलर्सच्या घरात पोचली आहे. **कुठली राष्ट्रे कुठल्या राष्ट्रांच्या बाजारपेठा जिंकत आहेत ह्याबाबतचे साधनेचे मत वस्तुस्थितीशी सुसंगत नाही आणि खुल्या व्यापाराचा उपयोग फक्त समृद्ध देशांना होतो हा विचार तर सद्यः परिस्थितीत हास्यास्पद वाटतो.**

गॅटच्या सर्व १०८ सभासद देशांना मान्य होईल असा मसुदा तयार करायचा म्हणजे त्यात तडजोडही आलीच. बुद्धिसंपदा हक्क किंवा पेटन्ट्सबाबत हक्क ह्या संबंधीच्या तरतुदी नक्कीच अमेरिकेच्या हिताच्या आहेत. सर्वात जास्त संशोधन अमेरिकेत होत असते आणि त्याची बिदागी दीर्घकाळपर्यंत अमेरिकन कंपन्यांना मिळत राहील अशी त्यांत तरतूद आहे. गरीब देशांतील वाढत्या उत्पादनशक्तीच्या स्पर्धेला तोंड द्यायचा बचावात्मक पवित्रा म्हणून अमेरिकेने हा आग्रह धरला आहे हे उघडच आहे. पण ह्यावरून डंकेल प्रस्ताव व खुला व्यापार हा एक केवळ समृद्ध राष्ट्रांच्या व खास अमेरिकेच्या फायद्याचा आराखडा आहे असे म्हणणे साफ चुकीचे होईल.

गॅटचे अनेक वर्षांपासून असलेले प्रमुख अर्थशास्त्रीय सल्लागार प्रा. जगदीश भगवती हे मूळचे

भारतीय आहेत. खुल्या व्यापाराने फक्त समृद्ध देशांचा फायदा होतो ह्या जुन्या समजुतीमुळे भारताचे अपरंपार नुकसान झाले आहे हे त्यांनी अनेकदा दाखवून दिले आहे. बुद्धिसंपदा हक्कासंबंधीच्या तरतुदी आम्हांला मान्य नाहीत म्हणून भारतीय प्रतिनिधींनी सह्या करायचे नाकारले असते तर कोणाचे काहीही बिघडले नसते, बाकीच्या १०७ देशांनी सह्या केल्या असत्या. अर्थात, भारतीय निर्यातीवर अडथळे आणणाऱ्या देशांविरुद्ध तक्रार करायला मात्र भारताला गॅटची मदत घेता आली नसती. आंतरराष्ट्रीय व्यापारात विघ्ने आली तर त्यांचा अंतर्गत परिस्थितीवर परिणाम होणे अपरिहार्य असते. आयात करण्यासाठी परकीय चलन लागते ते निर्यात करून मिळवावे लागते आणि तेलासारख्या मूलभूत गरजांची आयात होऊ शकली नाही तर देशात काय गदारोळ माजेल ह्याची कल्पना (न) केलेली बरी.

डंकेल प्रस्तावातील काही तरतुदी भारताच्या दृष्टीने तोट्याच्या आहेत. (मुख्यतः, बुद्धिसंपदा हक्कासंबंधी.) तशाच त्या बाकीच्या अप्रगत देशांच्या दृष्टीने तोट्याच्याच आहेत आणि तरी देखील मसुद्यावर १०८ सह्या आहेत. त्या बहुतांशी अप्रगत देशांच्याच आहेत. मसुद्याच्या तरतुदींच्या एकंदर जमा-खर्च पाहता जमेपेक्षा खर्चच जास्त असता तर ह्या सर्व अप्रगत देशांनी सह्या केल्या असत्या का? जमेच्या बाजूला दोन मोठ्या गोष्टी. एकतर समृद्ध देशांनी कमी अडथळे उभे केले की आपल्या कमी वेतनाच्या श्रमशक्तीच्या जीवावर समृद्ध देशातील बाजारपेठांत आपला माल विकता येतो, देशाला रोजगार मिळतो, गरीबी घटते. दुसरी गोष्ट म्हणजे परकीय तंत्रज्ञान विकत घेता येते आणि अप्रगत देशांच्या विकासाकडे चाललेल्या वाटचालीत परकीय तंत्रज्ञानाचा भाग मोठा आहे. १९६६ साली सुरू झालेली हरितक्रांती रॉकफेलर फाऊंडेशनच्या मेक्सिकोतील प्रयोगशाळेत निर्माण केलेल्या संकरित गव्हावर आधारित होती. कारखाना क्षेत्रातील जवळजवळ सर्वच तंत्रज्ञान पाश्चात्य देशातून आले आहे.

ह्याबाबत शरद जोशी काय म्हणतात? ते वाचण्यासारखे आहे. (शेतकरी संघटक, २१ मार्च १९९३, पृष्ठ ९)

''परकीय तंत्रज्ञानाची तस्करी करणाऱ्यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांना काही लाभ मिळवून दिलेला नाही आणि गेल्या तीस वर्षात शेतीचा जो विकास झाला, निदान जी उत्पादन-वाढ झाली त्याचे श्रेय परदेशी संशोधनाला आणि शास्त्रज्ञांना आहे. परदेशातील अद्ययावत संशोधन भारतीय शेतकऱ्यांना पैसे टाकून वापरायला, तातडीने वापरायला मिळाले तरी त्याचे समाधान आहे. किंबहुना, परदेशी शास्त्रज्ञांचा कष्टांचा फुकट फायदा घ्यावा ही शेतकऱ्यांची प्रवृत्तीच नाही. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात हिंदुस्थान शेकडो वर्ष मागे आहे. केवळ २० वर्षांच्या अवधीत परदेशी तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, औषधे विनाखर्च वापरायला मिळाली तर परदेशी शास्त्रज्ञांविषयी सर्वसामान्य जनांच्या मनात कृतज्ञता भाव असेल.''

हे विचार अगदी पटण्यासारखे आहेत. दुसऱ्या कुठल्याही वस्तूसारखीच नव्या तंत्रज्ञानासाठी किंमत मोजायला लागली तर लगेच त्याचा अर्थ शेतकरी गुलाम होईल असा लावायचा का? तुम्ही निर्माण केलेले तंत्रज्ञान आम्हाला फुकट द्या, ही अरेरावी आपण कशाच्या जीवावर करू शकतो?

साधनेने उभा केलेला दुसरा बागुलबुवा म्हणजे परकीय भांडवल. भारतीय शेती हा श्रमप्रधान उद्योग आहे. परदेशी भांडवलाला इथे येऊन शेती करण्यांत काय फायदा? अमेरिकन यांत्रिक तंत्रज्ञान वापरायचे म्हणजे त्याला सलग अशी हजारो एकर जमीन पाहिजे. ती भारतात कुठल्या प्रदेशात मिळणार? तसा सलग जमिनीचा तुकडा एका मालकीसाठी उभा करण्यासाठी परदेशी भांडवलदाराला हजारो शेतकऱ्यांशी वाटाघाटी कराव्या लागतील. त्यापेक्षा आपलं जीवतंत्रज्ञान विकून फायदा करणे परदेशी भांडवलदारांना सोयीस्कर जाईल. इथे येऊन शेती करण्यात अमेरिकन किंवा युरोपियन भांडवलदारांना काही रस नाही. तेव्हा परदेशी भांडवल इथे येऊन शेतकऱ्यांना गुलाम बनवेल हा मुद्दा निराधार आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सूत्र अगदी सोपे आहे. ज्या गोष्टी आंतरराष्ट्रीय किंमतीहून कमी किंमतीत भारतात उत्पन्न केल्या जाऊ शकतात त्या निर्यातीस पात्र होतात. ज्या गोष्टींची निर्यात होईल त्यांच्या किंमती व उत्पादन वाढेल. त्या गोष्टींच्या उत्पादकांची उत्पन्नेही वाढतील. धान्ये, भाज्या, फळे, फुले ह्या शेतमालाच्या किंमती आज भारतात आंतरराष्ट्रीय किंमतीहून कमी आहेत. खुल्या व्यापारामुळे भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणावर निर्यात करू शकतील. ह्यात त्यांचे नुकसान कसे?

ह्याची उलटी बाजू म्हणजे कारखाना माल. खुल्या व्यापारामुळे खते, पोलाद, अवजारे ह्यांच्या किंमती उतरतील. शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल. ह्यात त्यांचे नुकसान कसे?

युरोपियन, जपानी, अमेरिकन, कॅनेडियन शेतकऱ्यांना भारतीय शेतकऱ्यांच्या तुलनेत अनेक पटींनी जास्त अनुदाने मिळतात. खरे म्हणजे भारतीय शेतकऱ्यांवर करच बसविलेला आहे असे आता सर्वमान्य झाले आहे. डंकेल प्रस्तावानुसार ही अनुदाने रद्द झाली, जकात कमी झाली तर समृद्ध राष्ट्रातील शेतकऱ्यांशी स्पर्धा करण्यास भारतीय शेतकऱ्याला मदत होईल हे उघडच आहे. मात्र डंकेल प्रस्तावामुळे भारतीय शेतकऱ्याचे भले होईल असे जेव्हा शरद जोशी सांगतात त्यात न पटण्यासारखे काय आहे?

खुल्या व्यापाराने संघटित क्षेत्रात पहिल्या एक-दोन वर्षांत रोजगार कमी होतील, अन्नधान्याच्या किंमती वाढतील. ह्या कारणास्तव साधनेने खुल्या अर्थव्यवस्थेला विरोध केला असता तर ते समजण्यासारखे होते. अन्नधान्याच्या किंमती वाढतात तेव्हा असंघटित क्षेत्रातील मजुरांची स्थिती हालाखीची व्हायची असते. त्यामुळे त्यांना संरक्षण मिळेल अशा तरतूदी सरकारने केल्या पाहिजेत, असा आग्रह साधनेने धरला असता ते समजण्यासारखे होते. पण शेतकऱ्यांचे अहित टाळण्यासाठी डंकेल प्रस्तावाला विरोध करा, सरकारविरोधी लढे उभे करा हे साधनेचे आवाहन मला समजू शकत नाही.

शरद जोशींचे म्हणणे बरोबर असेल किंवा चुकीचे असेल. पण तुम्हाला त्यांचे म्हणणे का पटत नाही त्याची चिकित्साही कधी साधनेत वाचायला मिळत नाही. औरंगाबादला एवढा मोठा मेळावा झाला. होतकरु शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रयोगांचे उत्साहाने प्रदर्शन भरविले. सीताशेतीसारख्या अभिनव प्रयोगाचा मुहूर्त झाला आहे. लक्ष्मीमुक्तीचा क्रांतिकारक कार्यक्रम घडून येतो आहे. साधनेने ह्याबद्दल विशेषांक काढायला हवा होता. पण आतापर्यंत महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाची चाहूल घेत राहिलेल्या साधनेमध्ये ह्याबाबत कौतुकाचा एक शब्द वाचायला मिळत नाही.

काही झाले तरी साधना आतापर्यंत चालत राहिलेल्या निर्बंधयुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराची भीती बाळगलेल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करते. भारतीय शेतकऱ्यांना, भारतीय उद्योजकांना कुठल्याही स्पर्धेत हार खावी लागेल असा न्यूनगंड भारतीय समाजवाद्यांमध्ये आढळतो, तसाच तो साधनेच्या संपादकीयात जाणवतो. शरद जोशींच्या हाकेत भविष्याबद्दल उमेद आहे. साधनेची भूमिका केवळ नकारात्मक व तीही कुठल्याही युक्तीवादावर न आधारलेली आहे.

साधनेच्या दिवाळी अंकात कुसुमाग्रजांच्या विश्वेश्वर सूर्याकडून आणलेला इतका सुंदर आदेश होता.

*''काळोखाचे कीर्तन थोडा वेळ विसरा*
*काळजात जपा उजेडाचा वसा''*

शरद जोशींच्या काळजात उजेडाचा वसा जपलेला आहे. हा त्यांच्या आदेशामधील व साधनेतील संदेशामधील मुख्य फरक आहे.

●●●

## २५ फेब्रुवारी १९९४ कापूस रॅलीचे वृत्त

# पोलीसांची प्रचंड दडपशाही तरीही ‘रॅली’ यशस्वी

पोलीसांनी प्रचंड दडपशाही करून, ठिकठिकाणी जिल्ह्यात नाकेबंदी करून कार्यकर्त्यांना अटक केली. मात्र तरीही गनिमी काव्याने शेतकरी संघटना कार्यकर्ते व नेत्यांनी प्रतिकात्मक कापूस रॅली सीमापार केली.

शेतकरी संघटनेचे आजचे प्रतिकात्मक सीमापार कापूस आंदोलन दडपून टाकण्यासाठी कालपासून जिल्ह्यात सर्वत्र प्रचंड प्रमाणावर पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. अमरावती सर्किट हाऊसवर संघटना नेते श्री. शरद जोशी यांना पोलीसांनी स्थानबद्ध केले व सायंकाळी त्यांची सुटका केली. विधानसभा उपसभापती ॲड. मोरेश्वर टेमुर्डे, आ. सरोजताई काशीकर, आ. वसंतराव बोंडे यांचेसह जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले.

सायंकाळी ४.३० वा. पांढुर्ण्या नजिक कापूस रॅली सीमा पार झाल्याचे रात्री ८.३० वा. वृत्त आले. पोलीसांची दडपशाही असतांना ठिकठिकाणाहून शेतकऱ्यांनी पोलीसांना हुलकावणी देऊन पांढुर्ण्याकडे कूच केली. माहूली जहागीर येथे संघटनेचे प्रांत अध्यक्ष पाशा पटेल, आ. वामनराव चटप, प्रकाश पोहरे, श्रीकांत तराळ, संजय कोल्हे यांनी कापसाची दहीहंडी फोडून कापसाची गाठोडी घेऊन निघालेल्या शेतकऱ्यांच्या रॅलीचे नेतृत्व केले. रॅलीत १५० वाहने सहभागी झाली होती.

**मोर्शीत चक्काजाम**

मोर्शी मार्गे पांढुर्ण्याकडे रॅली रवाना झाली. सावरखेड-लेहगाव मार्गे मोर्शी येथे आल्यानंतर प्रतिकात्मक कापूस रॅली दोन भागात विभागली गेली. पोलीस उपाध्यक्षक अरविंद गिरी यांच्या पोलीस ताफ्याने रॅलीचे शेपूट अडविले. पुढे झालेल्या कार्यकर्त्यांनी त्यामुळे मोर्शीच्या जयस्तंभ चौकात ‘चक्का जाम’ केला. पुरुष व महिला कार्यकर्त्यांनी रस्त्यावर बैठक मारली. तेथे रस्त्यावरच सभा होऊन प्रकाश पोहरे, श्रीकांत तराळ, संजय कोल्हे यांची भाषणे झालीत.

दरम्यान आज सकाळी अमरावती जिल्ह्यात दडपशाही झाल्याचे वृत्त वर्धेत समजले. माजी प्रांत अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांच्या नेतृत्वात वर्धेतील कार्यकर्त्यांचा जथ्था वरूड येथे पोचला. ही रॅलीची तिसरी तुकडी होती. किशोर माथनकर यांचे सोबत अमरावती जिल्ह्यातील विजय कडू, नंदू बंड यांचेसह ५० ते ६० कार्यकर्ते होते. पोलीसांना गुंगारा देत गनिमी काव्याने माथनकर व सोबतचे कार्यकर्ते पांढुर्ण्यात दुपारी ४.३० वाजत पाहोचले. पांढुर्ण्याच्या गुजरी चौकात माथनकर यांची जाहीर सभा झाली. त्यानंतर कार्यकर्त्यांसह आजचे प्रतिकात्मक कापूस सीमापार आंदोलन शेवटी यशस्वी झाले. रॅली यशस्वी झाल्याचे वृत्त मोर्शीत पोचल्यावर तेथे पोलीसांच्या ताब्यात असलेल्या कार्यकर्त्यात उत्साहाचे उधाण आले. शेतकरी संघटनेचा विजय असो, शरद जोशी जिंदाबाद, कापूस आमचा : मालक आम्ही आदी घोषणांनी परिसर दणाणला. मोर्शीत पोलीसांनी प्रांत अध्यक्ष पाशा पटेल, आ. चटप, श्रीकांत तराळ, संजय कोल्हे, प्रकाश पोहरे, अरुण कोहळे यांना कलम ६८ अंतर्गत अटक केली. उशिरा सायंकाळी सुटका झाल्यावर ही सर्व मंडळी पुन्हा पोलीसांना गुंगारा देत रात्री ८.३० वा. पांढुर्ण्यात पोचली. गाठोड्यातून आणलेला कार्यकर्त्यांचा कापूस एकत्र करून राम नेवले यांनी पांढुर्ण्यात विकला. कापसाला १९०० रु. क्विंटल भाव मिळाला. आंदोलन यशस्वी केल्याचा आनंद कार्यकर्त्यांच्या, नेत्यांच्या चेहऱ्यावर झळकला.

**दडपशाहीचे सत्र**

काल रात्रीपासून अमरावती शहर व जिल्ह्यात ५ पोलीस उपअधिक्षक यांच्या नेतृत्वात १४ पोलीस निरीक्षक, ५० उपनिरीक्षक, ५००

## मुटभर कापूसही जास्त धोक्याचा

**— शरद जोशी**

मुठभर कापूसही शासनाला आता जास्त धोक्याचा वाटू लागल्याने राज्य सरकारने संघटनेचे कार्यक्रम हाणून पाडण्याचे अंगिकारले. मात्र हे शासनाचे मनसुभे शेतकरी संघटना कदापिही पूर्ण होऊ देणार नाहीत असे शरद जोशी यांनी अटके दरम्यानच्या वार्ताहर बैठकीत सांगितले.

बैठकीत बोलताना जोशी पुढे म्हणाले, शेतीतून निघणाऱ्या मालाच्या मालकाला आपला २५ किलो माल कुठेही घेऊन जाण्यासाठी कायदेभंग होत नाही. त्यासाठी हा कायदेभंग झाला अशी आय. पी. सी. कलमात कुठेही नोंद नाही. तरीसुद्धा पोलीसांनी ही दंडेली चालविली. याचा अर्थ काय? पोलीसांचे हप्ते बंद झाले, ते बुडू नये म्हणून पोलीसांची कारवाई असावी काय हे आता शोधायला हवे असे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे म्हटले की, मी शहरात येण्यापूर्वी डी. एम. पी. ढेरे यांना माझे अटकेची विचारणा केली. त्यांनी सांगितले अशी अटक होणार नाही. मग मी आमचे मित्र मोरेश्वर टेमुर्डे यांना विश्रामगृहावर भेटायला आलो अणि एस. पी. साहेबांनी अटक केली. या अटकेचे कारण एस. पी. यांना विचारल्यावर सांगितले की, वरून आदेश म्हणून अटक झाली. हा वरचा आदेश कुणाचा? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केली. प्रकाश पोहरे यांच्या निवावस्थानी आयकर विभागाची धाड का, असा प्रश्न विचारला असता याही प्रकरणात वरून आदेश जर नसला तर ते आश्चर्यच होईल असे जोशी यांनी म्हटले. याच वेळी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख हेही विश्रामगृहावर उपस्थित होते. त्यांना हे आंदोलन दडपण्यासाठी वरून आदेश आहेत असे ढेरे यांनी सांगितले. हा संदर्भ देऊन विचारणा केली असता त्यांनी मला माहीत नाही असे उत्तर देऊन उत्तर टाळले. हाताबाहेर प्रकरण जाऊ नये म्हणून पोलीसांनी कृती केली असावी, असे देशमुख यांनी सांगून त्यांची विश्रामगृहातून काढता पाय घेतला.

शिपाई, २५० महिला पोलीस, राज्य राखीव पोलीस दलाचे ५०० चे वर जवान तैनात करण्यात येऊन ठिकठिकाणी नाकेबंदी करण्यात आली. झडती सत्र सुरू ठेऊन स्मगलरांना द्यावयाची वागणूक भूमिपुत्रांना पोलीसांनी दिल्याने शेतकऱ्यात चीड निर्माण झाली होती. तरीही शेतकरी कार्यकर्ते संयम पाळून शांत होता. अमरावतीत सभेच्या ठिकाणी जाण्यास शेतकऱ्यांना अडविण्यात आल्याबद्दल तीव्र प्रतिक्रीया उमटत होत्या. वातावरण तप्त होते. पोलीसांनी ठिकठिकाणी वाहने अडवून कार्यकर्त्यांची झडती घेतली. वर्धा-नागपूर येथून ३०-३५ वाहनातून येणारे ४ हजार कार्यकर्ते पोलीसांनी वरूड मध्ये अडकवून ठेवले. संघटना नेते शरद जोशी यांची अमरावती व पांढुर्णा येथे सभा होती. मात्र त्यांना सर्किट हाऊसवरच पोलीसांनी स्थानबद्ध करून ठेवले होते. मोर्शी-वरूड येथे तर पोलीस बंदोबस्त कडक होता. हिवरखेडपर्यंत रस्त्यांच्या दुतर्फा रॅलीच्या स्वागतार्थ शेकडो शेतकरी कार्यकर्ते बिल्ले लावून स्वागतार्थ हजर होते. रॅलीचे रस्त्यात ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

शेतकरी संघटनेचे नेते अमरावती, वरूड, पांढुर्णा येथे पोलीसांना गुंगारा देत गनिमी काव्याने पोचलेत. श्री. किशोर माथनकर, नागपूर, जिल्हा प्रमुख राम नेवले, अरुण डोंगरे, नागबळी महाराज हे कार्यकर्त्यांसह पांढुर्ण्यात प्रथम पोचले. बोअरिंगचे सामान लावून कपडे बदलून मजुराच्या वेशात माथनकर व त्यांचे सहकारी पोलीसांच्या तावडीतून निघून गनिमी काव्याने पांढुर्ण्यात कसे पोचले ते पोलीसांना देखील कळले नाही.

## संत्र्यांचे माहिती कार्यालय

शरद जोशी यांची सभा ज्या धर्मादाय कॉटन फंड मध्ये होणार होती, तिथे पोलीसांची प्रचंड बंदोबस्त छावणी होती. कॉटन फंड मैदानाच्या प्रवेशद्वारावर हत्यारंबद शिपाई होते. अगदी समोर रस्त्याच्या कडेला एक संत्रविक्रेता बसला होता. येणारे गिऱ्हाईक संत्र्याचा भाव विचारीत-विचारीत सभेचे पर्यायी स्थळ विचारायचे आणि संत्र्याबरोबरच माहूली जहांगीराचे नाव घेऊन जायचे. तो संत्रविक्रेता होता ब्राह्मणवाडा गोविंदपूर येथील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते इंगळे गुरुजी! आज रॅली यशस्वी झाल्यानंतर प्रत्येक जण या अभिनव माहिती कार्यालयाची चर्चा करीत होता.

**दडपशाहीचे पालकमंत्र्याकडून समर्थन**

अमरावती सर्किट हाऊसवर जिल्हा पालकमंत्री ना. श्री. हर्षवर्धन देशमुख यांना काही पत्रकारांनी संघटना कार्यकर्त्यांच्या दपडशाहीबद्दल विचारणा करता, ''कुणी काही 'वाईट' करत असेल तर काळजी घेणे सरकारी यंत्रणेचे कामच आहे'' या शब्दात पालकमंत्र्यांनी दडपशाहीचे अप्रत्यक्षरित्या समर्थन केले. संघटना नेते अमरावतीत सभा घेण्यास आले होते व त्यांना सभेस उपस्थित राहण्यास शेतकऱ्यांना अडवणे, मज्जाव करणे, डांबून ठेवणे ही दडपशाही नव्हे काय? अशी विचारणा करता त्यावर अधिक काही बोलण्यास ना. देशमुख यांनी नकार देऊन शेतकऱ्यांप्रतीची आपली अनास्था दर्शविली.

●●●

# वाघिणींनी कापसाला एकविसशे भाव मिळविला

कापसाला आर. डी. एक्स. सारखे स्फोटक समजून प्रचंड दडपशाही करणाऱ्या पोलीसांच्या हातावर तुरी देऊन पांढुर्णा (मध्यप्रदेश) येथे प्रतिकात्मक कापूस रॅली घेऊन गेलेल्या शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मूठ-मूठ जमा केलेल्या कापसाला एकविसशे रु. प्रतिक्विंटल भाव मिळाला.

या महिला कार्यकर्त्या अंजनगाव बारी जि. अमरावती येथील होत्या. सौ. आशाताई देशमुख, सौ. पुंजाबाई डकरे, सौ. सुमनताई पोकळे, सौ. कमलाताई भांडे, सौ. रखमाताई निचत, सौ. कुसुमताई पांडळे, यांच्यासह अरुण साकुरे, रामचंद्र उजळणे, रामजी पोकळे, विजय दातीर, जयसिंग पुणे, माणिकराव सुने, रविंद्र कदम, अजय बाभूळकर या कार्यकर्त्यांनी पोलीसांना गुंगारा देतांना सांगितले की, आम्ही मध्यप्रदेशात साक्षगंधासाठी चाललो आहोत.

त्यांचा सगळा वेषसुद्धा तसाच होता. कालच्या पोलीस दडपशाहीचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत.

**ठाणेदार पाटील यांची फटफजिती**

बडनेरा येथील ठाणेदार पाटील यांनी अंजनगांव बारीच्या आठ कार्यकर्त्यांना गावातून उचलून नेले व त्यांना सांगितले की, आता रॅली सीमापर जाणे शक्यच नाही. पण अखेर अंजनगांव बारीच्या महिलाच सीमापार गेल्या व अशाप्रकारे गनिमी काव्याने ठाणेदार एम.एन. पाटील यांचे शब्द त्यांच्या घशात घातले.

**खेडोपाडी स्थानबद्धता**

चांदूर, बाजार, दर्यापूर, अचलपूर, अंजनगांव, भातुकली, नांदगांव खंडेश्वर, मोर्शी इ. तालुक्यातील अनेक खेड्यांमध्ये शेकडो कार्यकर्त्यांना पोलीसांनी गुरुवारी रात्रीपासून स्थानबद्ध करून ठेवले होते. कळाशीच्या दहा कार्यकर्त्यांना रात्री दोन वाजता वलगांव पोलीसांनी उचलून आणले. या कार्यकर्त्यांमध्ये नंदकुमार बंड, दिलीप वडतकर, दिपक लंघोटे, बाळासाहेब भेटाळू, बाळासाहेब किटुकले, सुभाष उभाड, ज्ञानेश्वर उभाड, ज्ञानेश्वर गादे, देविदास ढोके, नंदकिशोर सोमवंशी, डॉ. चंद्रकांत देशमुख, प्रमोद चौधरी इ. कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## लग्न वऱ्हाड?

**सौ. सुमनताई पोकळे यांच्या नेतृत्वात अंजनगाव येथून ५ महिला कार्यकर्त्या व ३५ कार्यकर्ते कापूस गाठोड्यां-सह एका वाहनातून निघाले. डोक्यावर कुंकवाचे टिळे लावलेल्या या कार्यकर्त्यांनी आपण लग्नाचे वऱ्हाड असल्याचे नाटक वठवून पोलीसांना गुंगारा देत थेट पांढुर्णा गाठले. महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आजच्या आंदोलनात सक्रीय होत्या. सुमारे २००० वर कार्यकर्ते पांढुर्ण्यापर्यंतच्या मोहिमेत ठिकठिकाणी स्थानबद्ध झाले.**

अमरावती जिल्हा विद्यार्थी आघाडीचे प्रमुख घनश्याम पेठे इर्विन चौकात आपल्या सहकाऱ्यांसमवेत शरद जोशींच्या स्वागताच्या कमानी उभारत असतांना त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. तर सुरेश चोपडे यांना जंगलात धावाधाव करून पकडण्यात आले.

***'दैनिक देशोन्नती'वरून साभार***

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th March, 1994

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
March 6, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# गुजरातमधील 'गॅस रोको' आंदोलनाचे यश

२६ जानेवारी १९९४ रोजी गुजरातमधील झगडीया येथे 'गॅस रोको' आंदोलनासाठी जमा झालेल्या गुजरात व इतर राज्यांतील शेतकऱ्यांच्या सभेत श्री. शरद जोशींचे भाषण सुरू असतांना एक डी. वाय्.एस्.पी. व्यासपीठावर काही निरोप घेऊन आले. 'अमेठीकडे जाणारा गॅस बंद करण्यात आला आहे.' असा जिल्हाधिकारी व जिल्हा पोलील प्रमुखांचा निरोप शरद जोशींच्या तोंडून ऐकताच सभेचे मैदान टाळ्या आणि घोषणांनी दुमदुमून गेले. निरोपातील खरे खोटेपणाची शहानिशा करण्यासाठी गेले. पाचजणांचे पाहणीपथक रवाना करण्यात आले. कॉम्प्युटरच्या साहाय्याने गॅसचे नियंत्रण करण्याच्या कक्षात जिल्हाधिकारी व पोलीसप्रमुखांनी पाहाणी पथकाला गॅस बंद असल्याची खात्री पटवून दिली. पथकाचा अहवाल मिळताच सभेने पुन्हा जयघोष केला.

गेली कित्येक वर्षे विजेच्या अफाट दराविरुद्ध सतत आंदोलन करणाऱ्या 'गुजरात खेडूत समाज' ने, गुजरातमधील खजिन वायू वापरून गुजरातमध्ये वीज तयार केली, तर बिहामधून आणलेल्या कोळशावर तयार होणाऱ्या विजेपेक्षा किती तरी स्वस्त असेल, कारण बिहारमधून कोळसा आणातांना होणारे नुकसान, भ्रष्टाचार आणि वाहतूक वगैरे खर्च जास्त असतो ही भूमिका घेऊन आंदोलनाची तयारी केली होती. या आंदोलनासाठी महाराष्ट्रात त्यावेळी मराठवाड्यात विद्यापीठ नामांतराच्या प्रश्नावरून उद्रेक उसळला असतांना आणि बुलढाण्याजवळ कापूसउत्पादक शेतकऱ्यांवर पोलीसांनी लाठीमार केला असतांनासुद्धा सुमारे पाच हजार शेतकरी स्त्रीपुरुष हजर होते. त्याखेरीज मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा या राज्यांतूनही मोठ्या संख्येने शेतकरी या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते.

गॅस बंद झाल्याचे ऐकल्यावर जयघोष करणाऱ्या शेतकरी स्त्री-पुरुषांना शांत करून शरद जोशी म्हणाले, 'गॅस बाहेर जाणे बंद झाले ही आपल्या कार्यक्रमाला मिळालेली सफलता आहे हे खरे, पण हा काही आपल्या लढाईतला विजय नाही. कारण ही लढाईची नुसती सुरुवात आहे. खरी लढाई आता व्हायची आहे. त्यामुळे, एवढ्याशा सफलतेने गुंग होऊन जाऊ नका.'' शेतकऱ्यांना खुल्या बाजारपेठेचा वारासुद्धा लागू नये म्हणून योजना आखणाऱ्या शासनाशी लढाई म्हणून यापुढे शेतकऱ्यांनी वीजबिले, महसूल, कर्ज इत्यादी सरकारी देणी देणे बंद करावे असे शरद जोशींनी आवाहन केले.

या सभेमध्ये गुजरात खेडूत समाजचे नेते सर्वश्री बिपीन भाई देसाई, भागुभाई पटेल, लाभशंकर उपाध्याय, महिला कार्यकर्त्या इलाबेन पटेल, पंजाबच्या भारती किसान यूनियनचे सरदार भूपेंद्रसिंग मान व बलबीर सिंग राजेवाल, मध्य प्रदेशचे श्री. कमलेश आणि महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल व शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर इत्यादींची भाषणे झाली.

भर दुपारच्या उन्हाचा कडाका असतांना सुद्धा चारपाच तास तेथे जमलेल्या शेतकऱ्यांनी ज्या शिस्तीने आणि शांततेने व सजगतेने हा कार्यक्रम पाडला त्यामुळे तेथे हजर असलेल्या वृत्तपत्रप्रतिनिधींनी 'शिस्त शिकायची झाली तर या खेडूतांकडून शिकावी' अशी प्रशंसा केली. नवगुजरात टाईमचा प्रतिनिधी लिहितो, ''नाहीतर, अन्य राजकीय पक्ष एखादं आंदोलन सुरू करतात आणि नंतर लोकांचा जमाव त्यांच्या नियंत्रणाखाली राहात नाही.''

## औरंगाबाद अधिवेशन

### पावती पुस्तकांचा हिशोब

शेतकरी संघटनेच्या ५ व्या अधिवेशनाच्या स्वागतसमितीने अधिवेशन निधी, अधिवेशन शुल्क, स्वागतसमिती शुल्क, जाहिरात अशा प्रकारची पावतीपुस्तके कार्यकर्त्यांच्या हाती दिली होती. त्याची सर्व नोंद संगणकाद्वारे केलेली आहे. हिशोबाचे ऑडिट होण्यासाठी ही सर्व पावतीपुस्तके वापरलेली किंवा बिनवापरलेली जशी असतील तशी स्वागतसमितीला मिळणे आवश्यक आहे म्हणून स्वागताध्यक्ष श्री. हेमंत देशमुख यांनी तशी पत्रे महिन्याभरापूर्वीच पाठविली आहेत. पण, स्वागतसमितीकडे परत येणाऱ्या पावतीपुस्तकांचा ओघ अत्यल्प आहे.

पावती पुस्तके व त्यांचा हिशोब ही बाब गंभीरतेने घेऊन कार्यकर्त्यांनी तातडीने कृती करण्याचे हे आवाहन, त्यांना या बाबतीत शेवटची संधी देण्यासाठी करण्यात येत आहे.

ज्या कार्यकर्त्यांकडून पावतीपुस्तकांच्या हिशोबाची पूर्तता २१ मार्च १९९४ पर्यंत होणार नाही, त्यांची नावे ६ एप्रिल १९९४च्या 'शेतकरी संघटक' मध्ये प्रकाशित करण्यात येतील.

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.- ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**